Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २३१ • Title - Code :- MAHMAR49513 • शनिवार दि.१ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal

थोडक्यात

अजित पवारांच्या नेत्यांत जुंपली

मुंबई–भुजबळांनी आव्हाडांना खडेबोल सुनावले पाहिजेत मात्र त्यांचे पाठिंबा देण्याचे विधान अत्यंत दुर्दैवी आहे असे म्हणत मंत्री हसन मुश्रीफ यांनी मंत्री छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. मनुस्मृतीचा मुद्दा कुठेतरी बाजूला पडेल म्हणून, पाठिंबा देण्याचे वक्तव्य करणे हे अतिशय दुर्दैवी आहे असे हसन मुश्रीफ म्हणालेत. त्यांच्या या विधानानंतर आता अजित पवार गटाच्या दोन्ही नेत्यांमध्ये जुंपल्याचे चित्र आहे.छगन भुजबळ यांनी शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांची पाठराखण केली. त्यांच्याकडून चूक झाली. त्यांनी माफीही मागितली. आता विरोधाला विरोध करायचा म्हणून त्यांच्यावर टीका करण्यात अर्थ नाही असे भुजबळ म्हणाले होते. यवरूनच हसन मुश्रीफ यांनी हल्ला चढवला आहे. मुश्रीफ म्हणाले, ''जितेंद्र आव्हाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो असलेलं पत्रक फाडलं हे निंदनीय आहेच. पण आमच्या छगन भुजबळ यांनी आव्हाड यांची बाजू घेतली. मनुस्मृतीचा मुद्दा कुठे तरी बाजूला पडेल म्हणून आव्हाड यांना पाठिंबा देण्याचं विधान भुजबळ यांनी केलं हे अत्यंत दुर्दैवी आहे'', असा आरोप मुश्रीफांनी केला आहे.

सरकार पन्नास खोके घेऊन एकदम ओके

मुंबई–हिंजवडीमधील ३७ आयटी कंपन्याच्या स्थलांतराला राज्यातील ट्रिपल इंजिन जबाबदार आहे अशी टीका राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. तसेच हे सरकार केवळ घरं फोडा, इन्कम टॅक्स, सीबीआय आणि ईडी यात व्यस्त आहे असेही त्या म्हणाल्या आहेत. पुण्यातील सारसबागे समोरील अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला सुप्रिया सुळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला आहे.

यावेळी हिंजवडीमधील कंपन्यांच्या स्थलांतरावरून त्यांनी राज्य सरकारला चांगलेच धारेवर धरले आहे. त्या म्हणाल्या, ''महाराष्ट्राच्या ट्रिपल इंजिन सरकारचे आणखी एक अपयश समोर आले आहे. कारण फॉक्सकॉन प्रकल्पही पुण्यात येणार होता मात्र तो आला नाही. अनेक उद्योग आपल्या राज्यातून दुसऱ्या राज्यात जात आहेत. हिंजवडी राजीव गांधी इन्फोटेक पार्क हे शरद पवारांच्या दूरदृष्टीतून सुरू झाले. त्यात फेज–१,फेज –२, फेज–३ असे मोठे इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्यात आले. यासाठी देशातून लोक आले गुंतवणूक केली. मात्र आज तिथे काय परिस्थिती निर्माण झाली हे सर्वजण पाहात आहेत'', असा हल्ला सुप्रिया सुळे यांनी चढवला आहे.

उद्धव ठाकरेंच्या अडचणी वाढणार?

मुंबई–लोकसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेदरम्यान मुंबईत झालेल्या मतदानाच्या दिवशी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत भारतीय जनता पक्ष तसेच निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. या प्रकरणी भाजप नेते आशिष शेलार यांनी निवडणूक आयोगात तक्रार दाखल केली होती. उद्धव ठाकरेंची पत्रकार परिषद म्हणजे आचारसंहितेचे उल्लंघन असून यावर कारवाई करण्यात यावी. तसेच त्यांनी पत्रकार परिषद घेत खोटी व दिशाभूल करणारी विधाने केली असल्याचा आरोप शेलार यांनी केला होता. यावर आता निवडणूक आयोगातील कारवाईच्या प्रक्रियेला सुरूवात झाली आहे.

मुंबईतील मतदानाच्या दिवशी उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत भाजप आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. आता ही पत्रकार परिषद चौकशीच्या फेऱ्यात अडकली आहे. या संबंधी भाजपने केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. यावरुन आता आयोगही क्शन मोडवर आले आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यात उद्धव ठाकरे यांच्यावर काय कारवाई होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

शिंदेंनी मुख्यमंत्री असल्याचे भान ठेवावे दुष्काळग्रस्त भागात दौरा करावा–नाना पटोले

सातारा (वृत्तसंस्था)

परदेशी कशाला जायचं. असं ट्विट करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी ठाकरे गटाचे प्रमुख उध्दव ठाकरेंना टोला लगावला होता. त्याला काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी प्रत्युतर दिले आहे. राज्यात दुष्काळ आहे. शेतकरी आत्महत्या करीत आहेत. त्याकडे लक्ष द्या. पुन्हा तुम्हाला शेतीच करायची आहे, असा उपरोधिक टोला नाना पटोले यांनी लगावला आहे. काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष दिवंगत प्रतापराव भोसले यांच्या निधनानंतर कुटुंबीयांच्या भेटीसाठी ते विमानाने कराड विमानतळावर आले होते. यावेळी माध्यमांशी ते बोलत होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तीन दिवसाच्या सुट्टीवर सातारा जिल्ह्यातील त्यांच्या दरे या गावी आले आहेत. शेतीची पाहणी करतानाचा व्हिडिओ ट्विट करत परदेशी कशाला जायचं, गड्या आपला गाव बरा, असा टोला त्यांनी उद्धव ठाकरेंना लगावला होता. त्याच अनुषंगाने बोलताना नाना पटोलेंनी मुख्यमंत्र्यांना खोचक सल्ला दिला आहे. एकनाथ शिंदेंना नजिकच्या काळात शेतीच करायची आहे. पण, मुख्यमंत्री असल्याचं भान ठेवून सध्या त्यांनी दुष्काळग्रस्त भागात दौरा करावा, असे पटोले यांनी म्हंटले आहे.त्यावेळी बोलताना नाना पटोले म्हणाले की, राज्यात सध्या दुष्काळाची परिस्थिती आहे. दुसरीकडे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री सुट्टीवर आहेत. पुणे हीट अँड रन प्रकरणात दोघांचा बळी गेला आहे. परंतु, आम्ही लोकांचे प्रश्न मांडले तरी सत्ताधाऱ्यांना तो स्टंट वाटतो'', असं प्रत्युत्तर पटोले यांनी मंत्री शंभूराज देसाईंना दिले आहे.पुढे नाना पटोले म्हणाले की, महाराष्ट्रात काँग्रेसने लोकसभेच्या १७ जागा लढवल्या आहेत. त्यापैकी १६ जागा आपण जिंकू, असा अहवाल आहे. एका जागेवर अटीतटीचा सामना आहे. ती जागा निघाली तर लोकसभेच्या सर्व जागा आम्ही जिंकू'', असा विश्वास पटोलेंनी व्यक्त केला. तर पुण्यातील हिट अँड रन प्रकरणावर बोलताना पटोलेंनी म्हणाले की, गरिबांना रस्त्यावर चालण्याचा अधिकार राहिलेला नाही. श्रीमंत लोक, त्यांची मुलं पबमध्ये गाडीची रेस लावून गरीबांना चिरडून टाकतील. त्यावर आम्ही बोललो तर सत्तेतल्या नेत्यांना तो स्टंट वाटतो. अपघातावेळी त्या गाडीत कोण कोण होते, हे पुढे आले पाहिजे. पोलिस हे प्रकरण का दाबत आहेत? याचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी द्यावे. या प्रकरणात कोणाचा दबाव आहे, हे सगळे समोर आले पाहिजे'', अशी मागणी पटोलेंनी केली.

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमात चंद्रपूर जिल्ह्याचा तिसरा क्रमांक

चंद्रपूर । प्रतिनिधी

राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमात चंद्रपूर जिल्ह्याने महाराष्ट्रात तिसरा क्रमांक पटकाविला आहे. याबाबत २९ मे २०२४ रोजी राज्य तंबाखु नियंत्रण कक्ष, मुंबई येथे झालेल्या बैठकीत जिल्हा सामान्य रुग्णालय येथील सल्लागार डॉ. श्वेता सावलीकर यांचा सत्कार करण्यात आला.

मुंबई येथे संपूर्ण महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यांची आढावा सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी १ मे ते ३१ मे २०२४ दरम्यान संपूर्ण महाराष्ट्रात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेल्या तसेच वर्षभर केलेल्या उत्कृष्ट कार्याची पडताळणी करण्यात आली. यात जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूरने केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रातून तिसरा क्रमांक पटकवला आहे. सदर कार्यक्रम जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात राबवण्यात येतो. मुंबई येथे सत्कार समारंभाला जिल्हा सामान्य रुग्णालयातील जिल्हा सल्लागार डॉ.श्वेता सावलीकर ,कौन्सिलर श्री निरांजने उपस्थित होते.

अपघातात एक इसम जागीच ठार तर दुसरा जखमी

तळोधी (बा) । प्रतिनिधी

तळोधी (बा.) पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या नागभीड – सिंदेवाही मार्गांवरील सावरगाव येथील एच.पी.पेट्रोल पंपच्या पुढील काही थोड्या अंतरावर दुचाकी चालकाचा जागीच मृत्यू झाला व त्याचा सोबती जखमी झाल्याची घटना दि.३० मे रोजी रात्री साडे नऊ वाजताच्या सुमारास घडली.

चंद्रपूर – मुल – नागपुर महामार्गाच्या नागभीड–सिंदेवाही मार्गातील सावरगाव येथिल एच.पी.पेट्रोल पंप समोर काही थोड्या अंतरावर अपघात झाल्याची माहिती तळोधी पोलीस स्टेशनला मिळाली.दरम्यान घटनास्थळी दुचाकीचा अपघात होऊन २ इसम रस्त्याच्या कडेला गंभीर जखमी अवस्थेत पडलेले पोलिसांना दिसले. व त्यांचे दुचाकी वाहन क्र.एम.एच. ३१ के आर ६५२८ ही बाजुलाच पडलेली होती. यामध्ये परिमल दिवाकर मरस्कोल्हे (वय. २६ वर्षे) रा. देलनवाडी ता.सिंदेवाही हया तरुणाचा जागीच मृत्यु झाला. तर मयुर वसंत गेडाम (वय. २७ वर्षे) रा.देलनवाडी ता.सिंदेवाही हा तरुण जखमी झालेला आहे.त्याला तात्काळ आरोग्यदुत परमेश्वर मडावी यांचे सहकार्याने उपचारासाठी नागभिड येथे पाठविण्यात आले.दरम्यान दि.३१ मे रोजी मृतकाचे शवविच्छेदन करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली.सदर घटनेबाबत अकस्माक मृत्युची नोंद करण्यात आली आहे.वाहनावरिल नियंत्रण सुटल्याने दुचाकी घसरुन अपघात झाल्याचा प्राथमीक अंदाज पोलिसांकडून वर्तवण्यात आला आहे.पुढील तपास तळोधी पोलीस स्टेशनचे स.पोलिस निरीक्षक अजितसिंग देवरे करीत आहेत .

चंद्रपुरात उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट:तर मुंबई, पालघर आणि ठाण्यालाही इशारा

पुणे–राज्यात आज विदर्भामध्ये उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तर मराठवाड्यात आणि मध्य महाराष्ट्र विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता असल्याचे हवामान खात्याने म्हंटले आहे. विशेषत: विदर्भातील चंद्रपुरात उष्ण लाटेचा इशारा देण्यात आला आहे.

महाराष्ट्रात देखील विदर्भामध्ये उन्हाचा तडाखा अधिक तापदायक ठरत आहे. चंद्रपूर, ब्रह्मपुरी, वर्धामध्ये काल प्रत्येकी ४५.२ अंश तापमान नोंदवले गेले. चंद्रपूरमध्ये उष्णतेची लाट कायम राहणार आहे. तर मुंबई, पालघर आणि ठाण्याला उष्ण आणि दमट हवामानासाठी यलो अलर्ट दिला गेला आहे. बंगालच्या उपसागरामधील 'रेमल' चक्रीवादळ निवळल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे नागपूर, चंद्रपूर, वर्धा या तिन्ही जिल्ह्यांना उष्ण लाटेचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.तसेच कोकण आणि मराठवाड्यात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच दमट हवामान राहील असेही हवामान खात्याने म्हंटले आहे. पुढील चार दिवसांमध्ये राज्यात पावसाची हजेरी पाहायला मिळणार असल्याचे हवामान खात्याने म्हंटले आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील तापमानात सातत्याने बदल पाहायला मिळत आहेत.दरम्यान, आता देशात मान्सूनचे देखील आगमन होणार असल्याने दिलासा मिळणार आहे. येत्या २४ तासांत कधीही मान्सून भारतीय सीमेत प्रवेश करू शकतो, पुढील २४ तासांत केरळमध्ये मान्सूनच्या आगमनासाठी परिस्थिती अनुकूल राहील असे हवामान खात्याने म्हंटले आहे. यावेळी केरळमध्ये वेळेआधी मान्सून दाखल झाला आहे. येत्या १० जूनपर्यंत मान्सून राज्यात येणार असल्याचंही सांगण्यात येत आहे.

नागभीड –ब्रम्हपुरी राष्ट्रीय महामार्गावर दररोज धावण्याचा सराव करून भारतीय सुरक्षा सैन्य दलात आणि महाराष्ट्र पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगाणारे तरुणांचे धावतानाचे आनंदमय क्षण. छाया :प्रणय बांगरे.

चिमूर तसेच संपूर्ण तालुक्यात कृत्रिम रेती टंचाई चा मार

चिमूर । प्रतिनिधी

चिमूर तालुक्यात शासकीय घरकुल बांधकाम तसेच घरकुल मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. नगरपालिका क्षेत्रात सुद्धा अनेकांचे बांधकाम सुरू आहेत. बांधकाम ही सतत चालणारी विकासात्मक प्रक्रिया आहे .मागील एक आठवड्यापासून चिमूर तसेच ग्रामीण भागात कृत्रिम रेति टंचाई निर्माण केल्यामुळे अनेक बांधकाम पूर्णपणे बंद पडले आहेत.

परिणामी अनेक छोटे मोठे बांधकाम ठेकेदार, बांधकाम मजूर, घरकुल लाभार्थी, सामान्य नागरिकांचे बांधकाम, शासकीय बांधकाम अडचणीत आले आहेत.

मागील एक वर्षापासून अवैध्य रित्या रेती वाहतूक करणारे गाव खेड्यातील नदीपत्रातून तसेच जंगलामधून दिवसाढवळ्या रेतीची तस्करी करीत होते. परंतु त्यांना आळा घालण्यासाठी महसूल विभाग किंवा वनविभाग सरसावले नाही, त्यामुळे या विभागाच्या अधिकाऱ्यावर शंका निर्माण होत आहे. मागील दोन वर्षांपासून रेती घाट लिलाव झाले नसल्याची माहिती समोर आली आहे. मग ह्या दोन वर्षात चिमूर तालुक्यात रेती कुठून येत होती.वाळूने भरलेल्या गाड्यांनी लोकांचे अपघात कसे झाले.लोकांनी तक्रारी करूनही अवैध रेती तस्करावर एकही कारवाई का करण्यात आली नाही.चिमूर तालुक्यातील महसूल विभाग आणि वन विभाग कुंभकरणासारखे झोपले होते का. इत्यादी अनेक संशयास्पद प्रश्न निर्माण झाले आहेत.संबंधित अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीची दखल घेऊन तत्काळ मार्ग काढण्याची मागणी भाजपचे माजी तालुकाध्यक्ष डॉ. दिलीप शिवरकर यांनी केली आहे.

लोकसभा निवडणूक : मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

गडचिरोली । प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक–२०२४ च्या पहिल्या टप्प्यात दि. १९ एप्रिल २०२४ रोजी १२–गडचिरोली–चिमुर लोकसभा मतदारसंघाकरिता झालेल्या मतदानाची मतमोजणी ४ जून रोजी सकाळी ८ वाजेपासून कृषी विद्यापीठाच्या इमारतीत सुरु होणार असून यासाठी जिल्हा प्रशासन पूर्ण तयारीनिशी सज्ज झाले आहे.

१२– गडचिरोली–चिमुर लोकसभा मतदार संघात आमगाव, आरमोरी, गडचिरोली, अहेरी, ब्रम्हपुरी आणि चिमुर या सहा विधानसभा मतदार संघनिहाय मतमोजणी होणार आहे. प्रत्येक विधानसभा मतदार संघाकरिता १४ टेबल याप्रमाणे सहा विधानसभा मतदारसंघाकरिता एकूण ८४ टेबल लावण्यात आले आहेत. तसेच टपाली मतपत्रिकेच्या मतमोणीसाठी १२ टेबल व इलेक्ट्रॉनिकली ट्रांसमिटेड पोस्टल बैलेट सिस्टम (ईटीपीबीएस) साठी एक टेबल असे एकूण ९७ टेबलवर मतमोजणी होणार आहे.

विधानसभानिहाय मतमोजणीच्या फेऱ्या : ६६– आमगाव विधानसभा मतदारसंघात मतमोजणीच्या एकूण २३ फेऱ्या, ६७– आरमोरी मतदारसंघात २२ फेऱ्या, ६८– गडचिरोली करीता २६ फेऱ्या, ६९– अहेरी करीता २१ फेऱ्या, ७३– ब्रम्हपुरीकरिता २३ फेऱ्या आणि ७४– चिमुर विधानसभा मतदारसंघात मतमोजणीच्या एकूण २३ फेऱ्या राहणार आहेत. यासोबतच प्रत्येक विधानसभा मतदार संघातून सोडत पद्धतीने निवडलेल्या प्रत्येकी ५ व्हीव्हीपॅटची पडताळणी करण्यात येणार आहे.मतमोजणीसाठी प्रत्येक मतदार संघनिहाय व प्रत्येक टेबलनिहाय मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले असून एकूण ११७ मतमोजणी पर्यवेक्षक, १३० मतमोजणी सहायक, १२० सुक्ष्म निरीक्षक व इतर १०१ सहायक कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. प्रत्येक उमेदवाराला इव्हीएम मतमोजणी, इटीपीबीएस व पोस्टल बॅलेट पेपर मतमोजणीसाठी एका टेबलसाठी एक याप्रमाणे ९७ प्रतिनिधी नेमता येणार आहे. त्यासाठी फॉर्म१८ भरूने आवश्यक आहे. मतमोजणी कक्षात प्रत्येक उमेदवाराचे प्रतिनिधीसाठी आसन व्यवस्था करण्यात आली आहे.

मतमोजणीस्थळी उमेदवारांच्या प्रतिनिधींकरिता कम्युनिकेशन कक्ष, पत्रकारांसाठी मीडिया कक्ष तसेच उमेदवारांकरिता कक्ष स्थापन केलेला असून सर्व कक्ष सुसज्ज आहेत. संपूर्ण परिसर सीसीटीव्ही नियंत्रणाखाली राहणार आहे. वीज पुरवठा अखंड सुरु राहावा यासाठी जनरेटरची व्यवस्था करण्यात आली आहे. जिल्हा निवडणूक अधिकारी संजय दैने तसेच भारतीय निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले दोन निवडणूक निरीक्षक, उप जिल्हा निवडणूक अधिकारी आणि संपूर्ण सुरक्षा यंत्रणा यांच्या निरीक्षणाखाली संपूर्ण मतमोजणीची प्रक्रिया पारदर्शकरित्या पार पडणार आहे. मतमोजणीस्थळी जिल्हा पोलिस अधीक्षक श्री निलोत्पल यांच्या मार्गदर्शनात त्रिस्तरीय सुरक्षा यंत्रणेची देखरेख आहे. यात बाह्य स्तरावर महाराष्ट्र पोलिस दल, दुसऱ्या स्तरावर राज्य राखीव पोलिस दल तर आतील स्तरावर केंद्रीय राखीव पोलिस दलाचे जवान सुरक्षेची जबाबदारी सांभाळत आहेत.मतमोजणी कक्षात मोबाईल किंवा कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तु, तसेच निवडणूक आयोगाने प्रतिबंध केलेल्या वस्तू नेण्यास मनाई करण्यात आली आहे.

हा दिवस पालकांसह मुलांमुलींत विशेष परिवर्तन घडवो!

या अतिशय पवित्र आणि आतिसुंदर पालक–मुलाच्या नातेसंबंधाचा गौरव करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे दरवर्षी १ जून रोजी जागतिक पालक दिन साजरा केला जातो. जागतिक पालक दिनाला हॅपी पॅरेंट्स डे असेही म्हणतात. हा दिवस पहिल्यांदा १९९४ मध्ये अमेरिकेत साजरा करण्यात आला. ज्ञानवर्धक माहिती श्रीकृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींच्या या संकलित लेखातून जाणून घ्या... संपादक.

आज जागतिक पालक दिन आहे. जगात आपली ओळख आपल्या पालकांद्वारे केली जाते. आपले पालकच आपल्याला घडवतात आणि त्यांच्या नावानेच आपल्याला ओळख मिळते. आज आपण जे काही आहोत ते आपल्या पालकांच्या संस्कारांमुळे आणि त्यांनी दिलेल्या संगोपनामुळेच आहोत. पालक आपल्या मुलांना घडवण्यासाठी आपल्या संपूर्ण आयुष्यातील आनंदाशी तडजोड करतात. पालकांचे आभार मानण्याचा दिवस म्हणजे जागतिक पालक दिन होय. जागतिक पालक दिन हा दरवर्षी १ जून रोजी साजरा केला जातो. दक्षिण कोरियामध्ये ८ मे रोजी आणि युनायटेड स्टेट्समध्ये जुलैच्या चौथ्या रविवारी पालक दिन साजरा केला जातो. दक्षिण कोरियन पदनाम १९७३मध्ये स्थापित केले गेले, पूर्वी ८ मे रोजी चिन्हांकित केलेल्या मदर्स डेच्या जागी, सार्वजनिक आणि खाजगी उत्सवांचा समावेश आहे. युनायटेड स्टेट्स दिवस १९९४मध्ये अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या नेतृत्वात तयार करण्यात आला आणि १ जून हा दिवस पालकांचा जागतिक दिवस म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केला आहे. फिलीपिन्समध्ये तो काटेकोरपणे पाळला जात नाही किंवा साजरा केला जात नाही, तर दरवर्षी डिसेंबरचा पहिला सोमवार पालक दिन म्हणून घोषित केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने १ जून हा जागतिक पालक दिन म्हणून घोषित केला. जगाच्या सर्व भागांतील सर्व पालकांचे मुलांशी निःस्वार्थपणे वचनबद्धतेबद्दल आणि या नातेसंबंधाचे पालनपोषण करण्यासाठी त्यांच्या आजीवन बलिदानाबद्दल कौतुक करण्यासाठी भारतात दि.१४ फेब्रुवारी रोजी पालकांचा उपासना दिवस साजरा केला जातो.

जागतिक पालक दिनाची सुरुवात सर्वात आधी सन १९९४मध्ये यूएन जनरल असेंब्लीमध्ये झाली. पालकांचा सन्मान व्हावा म्हणून या दिनाची सुरुवात करण्यात आली. हा दिवस साजरा करण्याच्या कल्पनेला युनिफिकेशन चर्च आणि सेंटर ट्रेंट लॉट यांनी पाठिंबा दिला आणि तेव्हापासून हा दिवस दरवर्षी साजरा केला जातो. सन २०१२मध्येच हा दिवस पालकांच्या सन्मानार्थ साजरा करण्यासाठी सर्वसाधारण सभेने निवडला होता. जागतिक पालक दिन हा दिवस मुलांच्या जीवनात पालकांचे महत्त्व नेमकं काय? हे पटवून देण्यासाठी साजरा केला जातो. पालकांची आपल्या आयुष्यातील महत्त्वपूर्ण भूमिका साजरी करण्यासाठी जगभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. काही ठिकाणी भाषणं, सभा, मैफिली आणि प्रदर्शनांचा समावेश करण्यात येतो. जगभरातील पालकांना कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. यावेळी आई–वडील आणि मुलांच्या नात्यात एक वेगळीच आपुलकी पाहायला मिळते. आई–वडिलांना देवाचे रूप मानले जाते. मुलांच्या सुखासाठी ते आयुष्यभर निस्वार्थपणे काम करतात. चांगल्या वाईट काळात त्यांच्या पाठीशी उभे राहतात. प्रत्येक पावलावर मुलांना साथ देतात. आपल्या मुलांना कशाचीही कमतरता भासू नये, यासाठी ते आयुष्यभर प्रयत्न करतात. मुलांच्या आनंदासाठी मेहनत करतात. म्हणूनच आई–वडील ही जीवनाची सर्वात मोठी देणगी मानली जाते. त्याची जागा आपल्या आयुष्यात कोणीही घेऊ शकत नाही. म्हणूनच दरवर्षी पालक दिन साजरा केला जातो.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

पालक दिनानिमित्त आम्ही आमच्या पालकांसाठी आमची आवडती डिश तयार करू शकतो. त्यांना बाहेर फिरायला घेऊन जाऊ शकतो. पिकनिकची योजना आखू शकतो. आम्ही घरीच पार्टी करू शकतो. त्यांच्या गरजेची कोणतीही वस्तू त्यांना भेट म्हणून दिली जाऊ शकते. आम्ही त्यांचा आवडता चित्रपट त्यांच्यासोबत घरीही पाहू शकतो. त्यासोबत आम्ही मजेदार स्नॅक्सचा आस्वाद घेऊ शकतो. आई–वडील आपल्या आयुष्यासाठी जे काही करतात, त्यामागे कोणताही स्वार्थ लपलेला नसतो. आपल्या मुलांच्या सुखासाठी ते काहीही करायला तयार असतात. आपल्या यशामागे सर्वात मोठा हात पालकांचा असतो. मात्र, याबाबत त्यांनी दिलेल्या अमूल्य प्रेमाबाबत आपण त्यांचे कधीही आभार मानत नाही. जागतिक पालक दिन हा पालकांचे आभार मानण्याचा दिवस आहे. तसेच, आपले वृद्ध आई–वडील हे आपले ओझे नसून ते आपली जबाबदारी आहेत याची जाणीव करून देण्याचा दिवस आहे. ही जबाबदारी आपण कर्तव्य समजून पार पाडली पाहिजे. या निमित्ताने अनेक देशांत आई–वडिलांना शुभेच्छा, भेटवस्तू दिल्या जातात.

!! जागतिक पालक दिनाच्या सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

दुष्काळ ग्रस्त परिस्थितीत पाझर तलावाचे पाणी चोरून बांधकामाला पुरवठा

एक दुसऱ्यावर जवाबदारी झटकत अधिकाऱ्यांचे हात वर यावर जिल्हाधिकारी काय कारवाई करतात याकडे लक्ष

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या बाळापूर गाव शिवारात मृद व जलसंधारण विभागाकडून गट नंबर ७० ते ९५ मध्ये पाझर तलावाचे काम करण्यात आले.ह्या पाझर तलावाचे पाणी गायी म्हशींना तसेच वन्यजीव प्राण्यांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था करण्यात आली. परंतु ह्या पाझर तलावा नजिक असलेल्या एका शेतकऱ्याने याबाबत शक्कल लढवली आणि पाझर तलाव ते शेतात खोदकाम करून पाईप लाईन टाकून आपल्या शेतात असलेल्या विहीरीत पाणी सोडले गेले. आणि आपल्या ह्या विहीरीतील पाणी हे बांधकामासाठी टँकरने विक्री केले जाऊ लागले. याबाबत स्थानिक नागरिकांनी अप्पर तहसीलदार,ग्रामिण छत्रपती संभाजीनगर,मृद व जलसंधारणचे अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्या कडे तक्रार केले असता पाणी तस्करी करणाऱ्याने साम,दाम,दंड वापरून दबाव निर्माण करत तक्रारदाराला चुप केले. तर मागच्या आठवड्यात दैनिक राजनिष्ठा ने ह्याच पाझर तलावाच्या सांडव्यावरील अतिक्रमण बाबत बातमी प्रकाशित केले असता भ्रमणध्वनीवरून दबाव तंत्राचा वापर करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पण आम्ही भेटण्यासाठी टाळले आहे. तसेच पाणी तस्करी बाबतीत सचिन पाटील,ग्राम सेवक, बाळापूर यांच्याकडून भ्रमणध्वनीवर माहिती घेतली असता मृद व जलसंधारण विभागाकडे असल्याने आणि अप्पर तहसीलदार, ग्रामीण भाग, छत्रपती संभाजीनगर यांना हीआम्ही ग्रामपंचायतचे पत्र दिले आहे पण कोणीही कारवाई केली नाही. तर उप विभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उप विभाग,

छत्रपती संभाजीनगर चे नाईकवाडे यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून माहिती घेतली असता आमचा पाझर तलावाच्या पाण्याशी काही संबंध नाही असे म्हणत हात वर केले तेव्हा ग्रामपंचायतने तुमच्या कडे केलेली आहे.यावर तुम्ही काय कारवाई केली असे विचारणा केली असता ग्रामपंचायतने कारवाई करायला हवे म्हणत हात वर केले. तर आम्ही मागच्या बातमीत किंवा ह्या बातमीत तस्कराचे नाव टाकले नाही असे असताना नाईकवाडे यांनी तस्करांना सांगितले यामुळे दबाव टाकण्याचा प्रयत्न होत आहे. पण ग्रामपंचायतने म्हणजे ग्रामसेवक आणि नाईकवाडे यांनी सांडवा अतिक्रमण करणारे व पाणी तस्कराकडून आपले आर्थिक हित साधत असून जवाबदारी झटकत हात वर करत आहे. मागच्या आठवड्यातच पाणी चोरणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले असतांना ह्या अधिकारींनी हात वर करत असल्याने आता जिल्हाधिकारी साहेब काय कारवाई करतात हे पाहू या.

विभागीय आढावा बैठकीत मान्यवरांचे मार्गदर्शन बांबू लागवड पर्यावरण व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

बांबू लागवड ही पर्यावरण व आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना शाश्वत आर्थिक लाभ होईलच शिवाय पर्यावरणाचे रक्षण होईल,असे मार्गदर्शन आज विभागीय आढावा बैठकीत मान्यवरांनी केले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेअंतर्गत बांबू व फळबाग लागवड कार्यक्रमाची विभागीय आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. बैठकीस पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, मनरेगाचे महासंचालक नंदकुमार, मनरेगा आयुक्त अजय गुल्हाणे, विभागीय आयुक्त मधुकर आर्दड, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी,वातावरणीय बदल कृती कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे, कोन्बॅक संस्थेचे संचालक संजीव करपे तसेच दुरदृष्य प्रणालीद्वारे विभागातील जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, कृषी विभाग, वन विभाग, सामाजिक वनिकरण, महसूल, सार्वजनिक बांधकाम, जलसंपदा अशा विविध विभागांचे अधिकारी सहभागी झाले होते. प्रास्ताविकात प्रविण दराडे यांनी सांगितले की, पर्यावरण संरक्षण व अनुकूल वातावरणीय बदल अभ्यासून शेतकऱ्यांना बांबू लागवडीसाठी प्रोत्साहित करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच शासकीय जागा, नदी, नाल्यांच्या काठावर लागवड करुन जमिनीची धूप थांबविणे, गाळ वाहून जाण्यास प्रतिबंध करणे इ. उपाययोजनांचा समावेश असेल. प्रोत्साहनासाठी बांबू उत्पादन व त्या उत्पादनाची जागतिक बाजारपेठेतील उलाढाल व त्यात भारताचा हिस्सा याचा अभ्यास करुन धोरण ठरविणे अशा उपायांचा समावेश आहे.नंदकुमार यांनी सांगितले की, भूजलाचा प्रश्न सोडविणे, जमिनीचा पोत सुधारणे, तापमानात घट व पर्जन्यमानात वाढ साध्य करण्यासाठी वैयक्तिक जमिनीवर २० टक्के हरित आच्छादन असावे. ते फळबाग लागवड, वृक्ष लागवड, कुरण लागवड अशा उपायांमधून साध्य करावे लागणार आहे. कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण मिळवून वायु प्रदूषण थांबविणे यासाठी या उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. त्यासाठी बांबू लागवडीला चालना देण्यात येत आहे. त्यातून शाश्वत आर्थिक उत्पन्न व पर्यावरण संरक्षण असे दोन्ही उद्देश साध्य होतात,असे त्यांनी स्पष्ट केले.बांबू लागवड व बांबूच्या विविध उपयोगांबाबत कोनबॅक संस्थेचे संचालक संजीव करपे यांनी सविस्तर सादरीकरण करुन उपस्थितांना माहिती दिली.

बाल धोरण मसूदा:सुधारणा, हरकती, सुचना मागविल्या

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महिला व बालविकास विभागातर्फे बालधोरणाचा प्रारुप मसूदा तयार करण्यात आला आहे. तज्ज्ञ व्यक्ती व शासनाचे अधिकारी यांचा समावेश असलेल्या समितीने हा मसूदा तयार केला आहे. महाराष्ट्र राज्य बाल धोरण व कृती आराखडा २०२२ असा हा मसूदा तयार आहे. हा मसूदा शासनाच्या https://womenchlid.maharashtra.gov.in व https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. प्रस्तावित बालधोरण हे इंग्रजी व मराठी भाषेत उपलब्ध असून त्यात आवश्यक बाबी, सुचना, सुधारणा, हरकती तसेच शब्दरचना, व्याकरण इ. संदर्भाने हरकती व सुचना नागरिकांकडून मागविण्यात आल्या आहेत. या सुचना नागरिकांनी दि.३० जून रोजी सायं. सव्वा सहा वा. पर्यंत महिला व बालविकास आयुक्तालय, २८ राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, पुणे यापत्त्यावर अथवा लहळश्रर्वेश्रिळलूसारळश्र.लो या इ–मेल पत्त्यावर पाठविण्यात यावा असे महिला व बालविकास विभागाचे आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले आहे.

पावसाळ्यामध्ये लाईटच्या खांबात वीज प्रवाह उतरला तर मनपाला कळवा प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

मनपा विद्युत विभागाचे मान्सून पूर्व कामे पूर्ण;पावसाळी व्यवस्थापनासाठी प्रशासन सज्ज

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या विविध विभागांच्या वतीने मा.आयुक्त जी श्रीकांत यांच्या निर्देशानुसार पावसाळी व्यवस्थापनासाठी विविध उपाय योजना करण्यात येत आहेत.

दरवर्षी पावसाळी हंगामात वादळी वाऱ्यांमुळे किंवा जोरदार पावसामुळे शहरातील पसंतीव्यांच्या खांबामध्ये किंवा म. रा. वि. वि.कंपनीच्या वीज वाहक खांबामध्ये वीज प्रवाह उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही.या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना या बाबत खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.यात विद्युत पोलला वायर , तारा,दोऱ्या बांधून त्याचा उपयोग कपडे वाढविण्यासाठी किंवा पाळीव प्राणी बांधण्यासाठी, छोटे बॅनर लावण्यासाठी करू नये. पावसाळ्याच्या दिवसात पोल मध्ये वीज प्रवाह उतरून अपघात होऊन प्राणहानी होण्याची श्यकता नाकारता येत नाही.याकरिता अबाल वृद्ध व नागरिकांनी पोलला स्पर्श करू नये किंवा दुभाजकावरून रस्ता ओलांडताना विद्युत पोल,केबल ,जंक्शन बॉक्स इत्यादींना स्पर्श करू नये.तसेच शहरातील विस्तारित भागात नागरिकांतर्फे फोनवर पथदिवे चालू व बंद करण्यासाठी स्वतंत्र वायर नसताना परस्पर खोलवर पथदिवे लावण्यात येतात. व पथदिवे वायर एमसीबी किटकॅट इत्यादी द्वारे चालू बंद करण्यात येतात. एखाद्या पोल मध्ये विद्युत प्रवाह असल्याचे निदर्शनास आल्यास त्वरित महानगरपालिकेस कळवावे.तसेच म. रा. वि. वि.कंपनी यांच्याशी संपर्क करावा व महानगरपालिकेत सहकार्य करावे.

या अनुषंगाने नागरिकांच्या सोयीसाठी पावसाळ्यात रस्त्यावरील पथदिव्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या निर्देशानुसार प्रभाग निहाय अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

यात इलेक्ट्रॉन कंपनीचे झोन प्रमुख झोन क्रं.०१ विक्रम जगताप ९८९०२८३५५५, कनिष्ठ अभियंता सागर गायकवाड ८८३०४८३६११. झोन क्रं.०२ लखन ठाकूर ८६६९०२८७६४,एस एस. काटे ९७६४९९७०९१. झोन क्र.०३. जमीर शेख ९६७३६५४४४४ , ऋषिकेश चव्हाण ९९७०४६६३५७ झोन क्र.०४. विकास सीतापुरे ९७६४४५५५४५, एस एस. काटे ९७६४९९७०९१. झोन क्र.०५.राजेश गोरे ७८४१९४४४४४,सतीश उरकुडे ९५१८७६४५१७. झोन क्र.०६.लक्ष्मण धनवे ७५८८०७५७७४,वैशाली मोरे ९०६७०१६९५०. झोन क्र.०७. विशाल चव्हाण ९९७५९८५८५९, सुफियान ९१७५११९१४५. झोन क्र.०८. सचिन सकट ९८३४६०४४८०,सय्यद बद्रोद्दिन ९७६४९९७०८८. झोन. क्र.०९.किशोर मानकापे ९८२३३२४५४५,अजित सुरवसे ९५६१७२०५४३. झोन क्र.१०. सचिन सकट ९८३४६०४४८०,अमोल गोसावी ७६२०४२१८४९. व उप अभियंता विद्युत मोहिनी वारभुवन (गायकवाड) ९७६४९९७०७७. वरील अधिकारी कर्मचारी यांच्याशी रस्त्यावरील पथदिव्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संपर्क करावा असे कार्यकारी अभियंता विद्युत छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

'तो' दुसरा मुलगा कुणाचा?:नाना पटोले यांचा खडा सवाल

कारने दुचाकीला धडक दिली तेव्हा गाडीतून २ तरुण उतरल्याचा केला दावा

मुंबई (वृत्तसंस्था)

पुण्याच्या कल्याणीनगरात पोर्शे कारने दुचाकीस्वार अभियंत्यांना उडवले तेव्हा कारमधून अल्पवयीन आरोपीसह अन्य एक तरुण उतरला होता. हा दुसरा तरुण कोण? असा डा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी या प्रकरणी उपस्थित केला आहे. त्यांच्या या सवालामुळे हा दुसरा मुलगा एखाद्या मोठ्या नेत्याचा होता काय? अशी चर्चा सुरू झाली आहे.

नाना पटोले यांनी मंगळवारी मुंबईत पत्रकारांशी वार्तालाप केला. त्यात त्यांनी पुण्यातील हिट अँड रन प्रकरणावरून राज्य सरकारवर टीकेची झोड उठवली. तसेच या प्रकरणाच्या तपासावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की, पुण्यात पोर्शे कारच्या धडकेत दोघांचा मृत्यू झाला. त्यावेळी कारमधून २ जण उतरले होते. तो दुसरा मुलगा कुणाचा होता? या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे.ललित पाटील प्रकरणात ससून रुग्णालय ड्रग्ज माफियांचा अड्डा बनल्याचे उघड झाले. त्यानंतर आता याच रुग्णालयात अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुणे बदलण्याचा प्रकार घडला. नागपूरमध्येही अशीच एक घटना घडली. मद्याच्या अंमलाखाली २ मुलींनी दोघांना उडवल्या. पण नंतर त्या सुटल्या. जळगावमध्येही अशाच एका घटनेतील एक आरोपी अवघ्या १० तासांत सुटला. हे सर्वजण श्रीमंत कुटुंबातील होते. पुण्यातील डॉक्टर डॉक्टर तावरेंच्या प्रकरणात काही मंत्र्यांची नावे येण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस काय करणार? त्यांनी या प्रकरणी आपला राजीनामा दिला पाहिजे, असे नाना पटोले म्हणाले.काँग्रेस आमदार रवींद्र धंगेकर गत वर्षभरापासून पुण्यातील पब संस्कृतीविरोधात लढा देत आहेत. मग या घटनेनंतरच ३६ पबवर का कारवाई करण्यात आली? अजित पवार पुण्याचे पालकमंत्री आहेत. त्यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले पाहिजे. हेच अजित पवारांचे कडक शासन? असा सवालही नाना पटोले यांनी यावेळी उपस्थित केला.नाना पटोले यांनी यावेळी मराठा - ओबीसी वाद संपण्याची गरजही व्यक्त केली. ते म्हणाले की, बीडमध्ये घडलेली घटना महाराष्ट्राची संस्कृती नाही. राज्य सरकारने त्याकडे दुर्लक्ष न करता त्याची गंभीर दखल घ्यावी. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत याविषयी मला काय उत्तर दिले होते हे त्यांनी आठवावे.दरम्यान, पुणे हिट अँड रन प्रकरण सुरुवातीपासून वादात सापडले आहे. या प्रकरणी पोलिस व डॉक्टरांवर आरोपीच्या कुटुंबाला प्राधान्य देण्याचा आरोप आहे. विशेषतः यासंबंधी अल्पवयीन आरोपीच्या आजोबांचे अंडरवर्ल्ड कनेक्शनही समोर आले आहे. मद्यपान करून पोर्शे चालवणाऱ्या अल्पवयीन आरोपीला सुरुवातीला जामीन मंजूर करण्यात आला. पण जनक्षोभानंतर तो रद्द करण्यात आला. त्याला ५ जूनपर्यंत बालसुधारगृहात पाठवण्यात आले. त्यानंतर या प्रकरणी त्याचे वडील विशाल अग्रवाल व आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांनाही अटक करण्यात आली. या दोघांवर पैशाच्या बळावर हे प्रकरण दाबण्यासाठी बेकायदा पाऊले उचलल्याचा आरोप आहे

पुणे पोलिस आयुक्तालय आवारात दारुच्या बाटल्यांचा खच:ऑन ड्युटी दारूचे सेवन केले जाते का?-विरोधी पक्षनेते वडेट्टीवार

पुणे (वृत्तसंस्था)–पुणे पोलिस आयुक्तालय आवारात दारुच्या बाटल्यांचा खच असलेला व्हिडिओ समोर आला आहे. यामुळे पुणे पोलिस आयुक्तालयात ऑन ड्युटी दारूचे सेवन केले जाते का? असा संतप्त सवाल विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे. सध्या पुणे पोलिस चांगलेच चर्चेत आले आहेत. पोर्शे कार हिट अँड रन प्रकरणात पुणे पोलिसांवर अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. त्यानंतर आता पुन्हा एकदा या दारुच्या बाटल्यांच्या व्हिडिओमुळे पुणे पोलिस संशयाच्या भोवऱ्यात आले आहेत. पुण्याच्या कल्याणीनगरमधील पोर्शे कार अपघात प्रकरण म्हणजेच हिट अँड रन प्रकरणी अल्पवयीन आरोपच्या रक्ताचे नमुने बदलण्याच्या आरोपात ससूनच्या दोन वरिष्ठ डॉक्टरांना अटक झाली आहे. यात अटक झालेले डॉ. अजय तावरे आणि डॉ. हरनोळ यांच्या जीविताला धोका असल्याचा संशय सुषमा अंधारे यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी देखील या प्रकरणी पुणे पोलिसांवर संशय व्यक्त केला आहे. त्याता आता विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनीही पुणे पोलिसांवर हे आरोप केले आहेत.या संदर्भात विजय वडेट्टीवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून पुणे पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. यामध्ये त्यांनी म्हटले की, 'पुणे पोलिस आयुक्तालय आवारात दारुच्या बाटल्या कशा? पुणे पोलिस आयुक्तालयात ऑन ड्युटी दारूचे सेवन केले जाते का? पुणे पोलिस आयुक्तालय आवारात दारुच्या बाटल्यांचा खच असलेला व्हिडिओ समोर आला आहे. पुणे पोलिस आयुक्तालय आवारातच या दारुच्या बाटल्यांचा खच सापडल्याने अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. या धक्कादायक व्हिडीओची दखल घेऊन पोलिस आयुक्तांनी चौकशी करावी आणि पोलिस आयुक्तालय आवारात नेमके चाललंय तरी काय याबाबत पूर्ण खुलासा पुणेकरांसमोर मांडावा.'

'ज्ञानराधा'त अडकल्या ७० कोटींच्या ठेवी:पैसे परत मिळवण्यासाठी रोज शंभर ठेवीदार झिजवताहेत बँकेचा उंबरठा

पुणे (वृत्तसंस्था)–बँक घोटाळे आणि त्यात ठेवीदारांचे पैसे अडकण्याचे प्रकार काही केल्या थांबत नाहीत. गेल्या वर्षभरात शहरातील आणि शहरात शाखा असलेल्या सहा बँकांमध्ये अपहार झाल्याने शेकडो ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकले आहेत. आता यात आणखी एका बँकेची भर पडली आहे.

सूतगिरणी चौक परिसरात असलेल्या ज्ञानराधा मल्टिस्टेट बँकेत गेल्या सहा महिन्यांपासून १५०० ठेवीदारांचे सुमारे ७० कोटी रुपये अडकले आहेत. ठेवीदार पैशांसाठी सातत्याने चकरा मारत आहेत. मात्र, बँक अधिकारी काही दिवसांतच पैसे मिळतील, अशी आशा दाखवत सहा महिन्यांपासून ठेवीदारांना माघारी पाठवत आहेत. सोमवारी (२७ मे) शंभर ठेवीदारांनी सकाळी बँक सुरू झाल्यापासून रात्री बंद होईपर्यंत ठिय्या दिला.पण, त्यानंतरही त्यांना एक रुपयाही मिळाला नाही. पैसे मिळतील, तोपर्यंत शिक्षणाची फी किंवा तुमच्या तातडीच्या गरजा भागवण्यासाठी खासगी सावकाराकडून कर्ज काढा, असा अजब सल्ला बँक व्यवस्थापक ठेवीदारांना देत आहेत. या बँकेत मुलांच्या शिक्षणासाठी, लग्नासाठी आणि सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्याची तडजोड म्हणून अनेकांनी ठेवी जमा केल्या होत्या. मात्र, मागील सहा महिन्यांपासून या बँकेतून पैसे विड्रॉल करणे बंद आहे. ठेवीदारांना केवळ तारीख पे तारीख देणे सुरू आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेट
Dnyanradha Multi State Co-Op.Credit Society Lt

अवकाळीचा फटका:पंढरपूर,बार्शी,मोहोळ,करमाळा,माढा तालुक्याला बसला सर्वाधिक फटका,बार्शीत शाळेवरील पत्रे उडाले,झाडे उन्मळून पडल्याने नुकसान

अनगर (वृत्तसंस्था)–मोहोळ तालुक्यातील आष्टी, खंडाळी, पापरी, येवती, वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसानाचा पंचनामा करून नुकसान भरपाई त्वरित मिळावी, अशी मागणी मागणीसाठी सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांनी तहसीलदारांकडे केली. तहसीलदार मुळीक म्हणाले, वादळी वाऱ्यामुळे झालेल्या नुकसान भरपाईचे पंचनामे करून अहवाल पाठवला आहे.

रविवारी पंढरपूर तालुक्यात वादळी वारे आणि पावसामुळे नुकसान झालेल्या भागास भेट देऊन आमदार समाधान अवताडे यांनी पाहणी केली. यावेळी उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळण्यासाठी पंचनामे करण्याची सूचना केली. रविवारी पंढरपूर तालुक्यातील ९१ गावात वादळी वारे आणि अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील ज्या भागात मोठे नुकसान झाले आहे त्या भागात सोमवारी जाऊन आमदार आवताडे यांनी पाहणी केली. पंढरपूर तालुक्यातील तावशी, एकलासपूर व अनवली या गावात अवकाळी पाऊस व वादळीवाऱ्या मुळे शेतीचे फार नुकसान झाले तसेच घरावरील, शाळेवरील पत्रे वाऱ्यामुळे उडून गेले आहे. आज प्रत्यक्ष भेट देऊन नुकसानाची पाहणी केली.सोलापूर जिल्ह्यात रविवारी सायंकाळी वादळी वाऱ्याने थैमान घातले. अन् शेतकऱ्यांची दैना केली. पत्र्याच्या घरांवरील छत वाऱ्यासोबत उडून गेले. बार्शी शहरात शाळेवरील पत्रे उडाले. तर काही भागात मोठी झाडे उन्मळून पडली. जुन्या घरांची पडझड झाली. या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. त्याबरोबर काही भागात पंचनाम्याला सुरुवात झाली तर काही भागात अद्याप पंचनामे सुरू नाहीत. पंचनामे वेळेत करण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे. वादळी वाऱ्याने जनावरांसाठी बनवलेल्या शेडवरील पत्रे उडाले. घरांवरील पत्रे उडाल्याने अनेकांचा संसार उघड्यावर पडले. मोहोळ तालुक्यातील पापरी, खंडाळी, देवडी भागात शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. पंढरपूर तालुक्यात द्राक्ष बागांना फटका बसला. आंब्याच्या झाडावरील फळांचा सडा पडला. मंगळवेढा तालुक्यात शेतीपिकांना फटका बसला. आंधळगाव भागात विद्युत पुरवठ्याचे खांब कोलमडल्याने काही भागातील वीजपुरवठा बंद होता.

बार्शी तालुक्यात विद्युत खांब कोलमडले. शेती पिकांचे नुकसान झाले. करमाळा व माढा तालुक्यात केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या आहेत. केळीच्या बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही भागात पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. तर काही भागात अजून अधिकारी बांधावर पोहोचले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना अजूनही पंचनाम्याची प्रतीक्षा आहे. नुकसान भरपाई मिळावी, अशी अपेक्षा आहे. करकंब। रविवारी सायंकाळी चार वाजण्याच्या सुमारास करकंबसह पंचक्रोशीत प्रचंड वाऱ्यासह पावसाने शेतकऱ्यांच्या शेतातील केळी, आंबा व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून परिसरातील शेतकरी उध्वस्त झाला आहे. या शेतकऱ्यांच्या पीकांचे त्वरित पंचनामे करावे, नुकसानग्रस्त शेतकरी व घरांची पडझड झालेल्या ग्रामस्थांनाही नुकसान भरपाईची रक्कम शेतकरी व ग्रामस्थांच्या खात्यात जमा करण्यात यावी अन्यथा रयत क्रांती संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशारा रयत क्रांती संघटनेचे जिल्हा युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष नंदकुमार व्यवहारे यांनी दिला आहे. बार्शी । शहरासह तालुक्यात वादळी वाऱ्याचा फटका बसला. मोठ-मोठी झाडे जमीनदोस्त झाली. अनेक घरांवरील पत्रे उडाले. शहरातील जनसेवा प्रशालेच्या ११ वर्ग खोल्यांवरील पत्रे उडून गेल्याने मोठे नुकसान झाले. केळीच्या बागा आडव्या झाल्या. जनावरांच्या निवाऱ्यासाठी मारलेले शेड तुटल्याने जनावरांचा निवारा नाहीसा झाला. शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. पापरी । रविवारी सव्वा चार वाजण्याच्या सुमारास पापरी, खंडाळी, देवडी यासह परिसरास वादळी वाऱ्याने झोडपले. मोठी झाडे, पत्रा शेड, विद्युत खांब उन्मळून पडले. तारा तुटल्या. अनेकांच्या घरावरील छत उडून गेले. केळी बागा भुईसपाट झाल्या. आंब्याची झाडे उन्मळून पडल्याने फळांचे अंथरून झाले. या नुकसानीचे पंचनामे सुरू करण्यात आले. रविवारच्या वादळात किरण चौधरी यांच्या घरावर बाभळीची फांदी पडली. श्री गणेशाची मूर्ती ठेवलेल्या शेडवरील शेड उडाले. समाधान भोसले यांच्या डाळिंब बागेतील एक हजारहून अधिक डाळिंब झाडे उन्मळून पडली. पाटील वस्ती भागातील शरद भोसले यांच्या घरावरील पत्रे सांगाड्यासह उडून गेले. शाहू भोसले यांच्या केळी बागेतील केळीचे धूड पडले.

मतमोजणी केंद्रात उमेदवारांसह मतमोजणी प्रतिनिधींना मोबाईल आणण्यास मनाई

जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांची माहितीर

हिंगोली (वृत्तसंस्था)–हिंगोली लोकसभा मतदार संघात मतमोजणी प्रक्रिया सुरु असतांना लोकप्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधींना मतमोजणी केंद्रात मोबाईल आणण्यास मनाई करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी बुधवारी (ता. २९) पत्रकार परिषदेत दिली आहे. येथील जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पत्रकार परिषद झाली. यावेळी जिल्हाधिकारी पापळकर यांच्यासह अप्पर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, अप्पर पोलिस अधिक्षक अर्चना पाटील, उपजिल्हाधिकारी रामेश्वर रोडगे उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी पापळकर यांनी मतमोजणी बाबत आढावा मांडतांना सांगितले की, लिंबाळा येथील शासकिय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे. लोकसभा मतदार संघातील सहा विधानसभा मतदार संघनिहाय प्रत्येकी १४ टेबलवर मतमोजणी होणार आहे. उमरखेड, कळमनुरी, हिंगोली विधानसभेसाठी प्रत्येकी २५ तर किनवट व वसमत विधानसभेच्या प्रत्येकी २४ तसेच हदगाव विधानसभेसाठी २३ मतमोजणीच्या फेऱ्या होणार आहेत. सकाळी टपाली मतदान मोजणी नंतर साडेआठ वाजता मतदान यंत्रावरील मतमोजणी होणार आहे. दुपारी तीन वाजेपर्यंत मतमोजणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.मतमोजणी केंद्राच्या परिसरात उमेदवारांना बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. मात्र उमेदवार किंवा त्यांच्या मतमोजणी प्रतिनिधींना मतमोजणी केंद्रात मोबाईल किंवा इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणता येणार नाहीत. सदर उपकरणे त्यांनी बाहेरच ठेऊन केंद्रात प्रवेश करावा. तसेच प्रत्येक फेरीची माहिती दिली जाणार आहे. त्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारण्यात आली आहे. मतमोजणी केंद्राच्या परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.दरम्यान, लोकसभा मतदार संघात ८५ वर्ष वयापेक्षा जास्त वय असलेल्या ९६९ मतदारांनी मतदान केले असून २३१ दिव्यांग, अत्यावश्यक सेवेतील ७, निवडणुक कर्तव्यावर असलेल्या अधिकारी व कर्मचारी अशा २,८५२ तर सेना दलातील ७११ मतदारांनी मतदान नोंदविले असल्याचे त्यांनी सांगितले.

Collector and District Election Officer, Hingoli

राज्यातील दुष्काळग्रस्त भागाच्या पाहणीसाठी प्रदेश काँग्रेसच्या विभागनिहाय समित्या:नागपूर विभाग समीतीच्या प्रमुखपदी विजय वडेट्टीवार

नागपूर (वृत्तसंस्था)–राज्यात दुष्काळाची भीषण परिस्थिती आहे. पिण्याच्या पाण्याची व जनावरांच्या चाऱ्यांची मोठी समस्या असून रोजगारही मिळत नाही. राज्यातील महाभ्रष्टयुती सरकारला दुष्काळाची चिंता नाही. जनता दुष्काळाने होरपळ असताना महायुती राजकीय साठमारीत व्यस्त आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त भागाला भेट देऊन तेथील परिस्थितीची माहिती घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने विभागनिहाय दुष्काळ पाहणी समित्यांची स्थापन केली असून या समित्या दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून विभागीय आयुक्तांना व प्रदेश काँग्रेसला अहवाल सादर करणार आहेत.नागपूर विभागीय समिती प्रमुख म्हणून विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची नियुक्ती केली आहे. तर सदस्य म्हणून डॉ. नितीन राऊत, सुनील केदार, रणजीत कांबळे, सुभाष धोटे, विकास ठाकरे, सहसराम कोरोटे, प्रतिभा धानोरकर, अभिजित वंजारी, सुधाकर आडबाले व अतुल कोटेचा यांचा समावेश आहे.प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या निर्देशानुसार व प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले यांच्या सुचनेवरून विभागवार जबाबदारी सोपवण्यात आलेली आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे मराठवाडा विभागाच्या समितीचे प्रमुख आहेत. विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात ह्यांच्याकडे उत्तर महाराष्ट्र विभागाची जबाबदारी दिली आहे. नागपूर विभागाच्या समितीचे प्रमुख विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आहेत.पश्चिम महाराष्ट्राचे समिती प्रमुख माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आहेत. कोकण विभाग समितीचे प्रमुख प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान आहेत तर अमरावती विभाग समिती प्रमुख माजी मंत्री यशोमती ठाकूर आहेत. या समितीत राज्यातील प्रमुख नेते, आमदार, माजी मंत्री, पदाधिकारी यांचाही समावेश आहे. ही समिती दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून परिस्थितीचा आढावा घेणार असून विभागीय आयुक्तांना निवेदन देणार आहेत तसेच प्रदेश काँग्रेसला आपला अहवाल देणार आहेत.

३१ मे जागतीक तंबाखू सेवन विरोधी दिना निमित्त बिर्ला इंडियन टुल कंपनीत व्यसनमुक्ती व्याख्यान

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

दि.३१/५/२४ रोजी वाळुज एम.आय.डी.सी.बिर्ला इंडियन टुल कंपनीत प्रदिप माळी यांची व्यसनमुक्ती जनजागृती.तंबाखू खाणे हे आरोग्याला हानिकारक आहे.तंबाखूच्या पुडीवर तंबाखूमुळे कर्करोग होतो हे ठळक अक्षरात लिहिलेले असते.त्याकडे सप्सेल दुर्लक्ष करून लाखो लोक तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करीत असल्यामुळे अनेकांना तोंडाचा कर्करोग होत आहे त्यामुळे अनेक लोकांचे तोंडच उघडत नाही.राज्यात तंबाखूजन्या पदार्थ उत्पादन व विक्रीवर प्रतिबंध असला तरी.राज्यात यावेळी आधार व्यसनमुक्ती संस्थेचे अध्यक्ष व राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्राप्त व गुणवंत कामगार श्री प्रदीप माळी यांनी व्यसनमुक्ती वर व्याख्यान देऊन नागरिकांना व्यसनमुक्ती जनजागृती करताना सांगितले की भारत देश हा तरुणांचा देश म्हणून जगात ओळखला जातो.आपल्या भारताची खरी संपत्ती ही युवाशक्ती आहे.परंतु हीच आपली युवा संपत्ती मात्र व्यसनाच्या वाढत्या प्रभावामुळे युवाशक्तीचा प्रवास विनाशाकडे चाललेला आहे तसेच व्यसनामुळे समाजामध्ये चोऱ्या.भांडण.तंटा लूटमार.खुन अशा घटनां मध्येवाढ दिसत आहेत व्यसनाच्या वाढत्या प्रभावामुळे तसेच व्यसन हे समाजाला लागलेली कीड आहे. समाजामध्ये दारू. बियर. बिडी. सिगारेट. तंबाखू. गुटखा.अशा अनेक व्यसनाच्या आहारी जाऊन अनेक तरुणांचा बळी गेलेला दिसून येत आहे.देशात दर सहा सेकंदाला एक.दिवसाला तीनहजार आणि वर्षाला आकरा लाख लोकांच्या संसाराची व्यसनाच्या कन्सरमुळे राख रांगोळी होताना आपण पाहतो आजचे युवक व्यसन करण्याला फसन समजतात परंतु शरीर संपत्ती हीच खरी संपत्ती असुन सुद्धा व्यसनामुळे समाजात अनेक वाईट घटना घडतात.म्हणून महीलांनी सुध्दा आपल्या वाढदिवसाला पतीकडे सोने.साडी न मागता पतीकडे व्यसनमुक्तीचा संकल्प मागा.तसेच मानवी आयुष्य खूप सुंदर आहे शरीर संपत्ती हीच आपली खरी संपत्ती आहे त्यामुळे देशातील प्रत्येक व्यसनाधीन व्यक्ती ही व्यसनमुक्त झाले पाहिजे. आपण सर्वजण व्यसनमुक्त राहून नवीन पुढे समोर आदर्श ठेवूया आणि आपले गाव आपले राज्य आपला देश व्यसनमुक्त ठेवूया व्यसनमुक्त राहा निर्व्यसनी आनंदाने जगा असे सांगितले भारत हा तरुण भारत देश हा तरुणांचा देश म्हणून जगात ओळखला जातो भारताची युवाशक्ती हीच आपली संपत्ती आहे मात्र व्यसनाच्या वाढत्या प्रभावामुळे युवाशक्तीचा प्रवास विनाशाकडे चाललेला आहे तसेच व्यसनामुळे समाजामध्ये चोऱ्या भांडण तंटा लूटमार बलात्कार अशा घटना वाढ दिसत आहेत व्यसनाच्या वाढत्या प्रभावामुळे तसेच व्यसन हे समाजाला लागलेली कीड आहे समाजामध्ये दारू. बिडी. सिगारेट. तंबाखू. गुटखा. अशा अनेक व्यसनाच्या आहारी जाऊन अनेक तरुणांचा बळी गेलेला दिसून येत आहे दरवर्षी व्यसनामुळे अकरा लाख लोकांच्या संसाराची राख रांगोळी होताना आपण पाहतो आजचे युवक व्यसन करण्याला शासन समजतात परंतु व्यसनामुळे समाजात अनेक वाईट घटना घडतात परंतु मानवी आयुष्य खूप सुंदर आहे शरीर संपत्ती हीच आपली खरी संपत्ती आहे त्यामुळे देशातील प्रत्येक व्यक्ती त्यामुळे देशातील प्रत्येक व्यसनाधीन व्यक्ती ही व्यसनमुक्त झाले पाहिजे आपण सर्वजण व्यसनमुक्त राहून नवीन पुढे समोर आदर्श ठेवूया आणि आपले गाव आपले राज्य आपला देश व्यसनमुक्त ठेवूया व्यसनमुक्त राहा निर्व्यसनी रहा आनंदाने जगा असा संदेश प्रदीप माळी व्यसनमुक्त प्रचारक प्रा.संजय काळे यांनी दिला तसेच व्यसनाचे दुष्परिणाम सांगून व्यसनमुक्ती वर मार्गदर्शन केले व्यसनमुक्ति जनजाजागृती साठी वैष्णव.एस.एस.जाधव साहेब.चौधरी . वैद्य .कवीश्वर .चिंचोलकर साहेब.गोंदिकर .बोडखे .भुरे .कुलकर्णी .युनियन अध्यक्ष संजय गोकोंडे.गणेश सदमस्तुल.गजानन बुलबुले.मंगेश शेंडकर.तसेच सर्व कामगार व कर्मचारी.उपस्थित होते कार्यक्रमाच्या शेवटी प्रकाश गवळी यांनी आभार प्रदर्शन करुन कार्यक्रमाची सांगता केली.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी

महागांव । प्रतिनिधी

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन दिनांक ३१/५/ २० २४ ला. महागाव तालुक्यातील मुडाणा येथे पुणे श्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्यात यावेळी गावातील सरपंच वैभव बर्डे. अंबादास पाटील. अरविंद पाईकराव. आशोकराव वानखेडे. गजानन दर्वेकर,नरेंद्र नप्ते,गोलू पठाण , भांडवले साहेबराव पाटील,रवी ढाहळे , बाळू जाधव, संतोष धुळधुळे ,वंदना जाधव , शरद बर्डे. शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष प्रवीण चव्हाण. उपस्थित ग्रामपंचायतचे सदस्य ज्येष्ठ नेते दिगंबर वाबळे बंडू लोखंडे ग्रामपंचायत कर्मचारी सचिव व सर्व गावकरी हजर होते अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास ग्रामपंचायत चे सचिव यांनी लोकांना समजावून सांगितला व त्यांच्यापासून प्रेरणा देण्यात आली यावेळी गावातील सर्व गावकरी मंडळी उपस्थित होते.

दावरवाडी येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

पैठण । प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील दावरवाडी येथील धनगर समाजाच्या वतीने अहिल्याबाई होळकर चौकामध्ये राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची २९९ वी जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले सकाळपासूनच आनंदाचा उत्सव म्हणून शेकडो नागरिकांची गर्दी बाजार मैदानात उपस्थिती होती मोठ्या आवाजाने घोषणा देऊन ही जयंती साजरी करण्यात आली ह्या वेळी उपस्थिती अहिल्याबाई होळकर सार्वजनिक समितीचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सरपंच डि.डी जाधव ग्रामपंचायत सदस्य श्याम तांगडे, उपाध्यक्ष किरण तांगडे ,महेंद्र खांडे ,सचिव प्रकाश देशमुख, सचिन लखोटीया, राजु राठोड, कीशोर नवगिरे, दादा घोडके, ज्ञानेश्वर मानधरे, नितीन एडके ,सतोष फाळके, सुरेश शिंदे, शिवचरण वैष्णव, किरण सातपुते विलास जाधव डी आर राऊत मुदशीर पठाण लक्ष्मण पैठणे संदीप भवरे बाळु मोरे ऋषी दहीभाते नदीम तांबोळी अनिल खंडागळे आदी पदाधिकारी यावेळेस उपस्थिती दर्शवली होती.

पैठण येथे अहिल्याबाई होळकर जयंती साजरी

पैठण । प्रतिनिधी

पैठण येथील राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची २९९वी जयंती मोठ्या उत्साहात पार पडली पैठण येथे अहिल्याबाई होळकर जयंती निमित्त मोटर सायकल रॅली काढण्यात आली या रॅलीमध्ये तालुक्यातून व शहरांमधून आलेले सर्व धनगर बांधव एकत्रित येऊन अहिल्याबाई होळकर जयंतीला सहभागी झाले होते.

महायुतीबाबत चुकीचा संदेश जाऊ नये यासाठी भुजबळांसारख्या नेत्याने जाहीर वक्तव्ये टाळवीत

भाजपा गटनेते आ.प्रविण दरेकर यांचा सल्ला

अहमदनगर । प्रतिनिधी

काल राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची बैठक पार पडली. या बैठकीत छगन भुजबळ यांनी विधानसभा निवडणुकीत भाजपने आमच्या पक्षाला जास्त जागा देण्याचा शब्द दिला होता असे विधान केले होते. त्यांच्या या विधानावर बोलताना भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी महायुतीबाबत चुकीचा संदेश जाऊ नये यासाठी छगन भुजबळ यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने अशा प्रकारची जाहीर वक्तव्ये टाळायला हवीत, असा सल्ला दिला आहे.

पत्रकारांशी बोलताना दरेकर म्हणाले की, छगन भुजबळ यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने अशा प्रकारचे जाहीर वक्तव्य टाळायला हवे होते. पक्ष चालवत असताना कार्यकर्त्यांना हिंमत देणे, मनोबल वाढवणे हेही तितकेच महत्वाचे असते. त्या उद्देशाने जास्तीचा वाटा आपल्याला मिळाला पाहिजे अशा प्रकारचे वक्तव्य भुजबळांचे असावे. जसे त्यांना वाटते जास्त वाटा पाहिजे मग भाजपाचे १०५ आमदार आहेत त्यांनी १०५ च्या खाली येऊन पुढे जायचे का? त्यांना जसे वाटते तसे प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्याला, नेत्याला वाटते. त्यातून असणारी प्रचलित स्थिती, प्रत्येकाचे स्थान या सर्व गोष्टींचे अवलोकन करून निर्णय घ्यायचा असतो. त्यांच्या असणाऱ्या जागांपेक्षा वाढीव जागा पाहिजेत मग भाजपाला १०५ च्या वर नकोत का? अशा प्रकारे समन्वयातून संतुलन साधूनच महायुतीत निर्णय होईल आणि देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट सांगितले आहे की, भाजपा मोठा पक्ष आहे. तुलनात्मक जागा मोठ्या प्रमाणावर भाजपाला असतील. सहयोगी पक्षांचे कुठेही अवमुल्यन होणार नाही याची काळजी घेऊन त्यांचाही सन्मान केला जाईल. दरेकर पुढे म्हणाले की, प्रत्येक पक्षाला, कार्यकर्त्याला, नेत्याला आपली भुमिका मांडण्याचा अधिकार आहे. आमचाही मोठा पक्ष आहे, कार्यकर्ते आहेत असे असताना कुणीही बोलायचे आणि आम्ही गप्प बसायचे, आमच्याकडे बूथ स्तरापर्यंत अपार कष्ट घेणारा कार्यकर्ता आहे तो जर नाराज झाला तर पक्षाची गती, वाटचाल यावर परिणाम होतो. आमच्यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्याची भूमिकाही तेवढीच महत्वाची आहे. त्याचबरोबर ४०० पार हा आमचा मुद्दा होता. तो मुद्दा समजविण्यात आम्ही कमी पडलो नाही. संविधानाच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर मोदी आणि आमच्या सरकारने, भाजपने कशा कशा भुमिका घेतल्या आहेत आणि काँग्रेसने कितीवेळा संविधान बदलले हे जनतेला सांगितलेले आहे. अशा प्रकारच्या शंका महायुतीतील नेत्यांनी मांडायला नको. जेणेकरून महायुतीबाबत चुकीचा संदेश जाऊ शकतो, याची भुजबळांसारख्या नेत्यांनी नोंद घ्यायला हवी. ससून रुग्णालयातील गैरकारभाराबाबत डॉ. पल्लवी सापळे यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमण्यात आली आहे. या समितीला विरोधकांनी आक्षेप घेतला आहे.

सत्याचा शोध घेनं हे साहित्यिकांचे काम आहे सत्य नेहमी अल्पमतात असत-प्रा.डॉ.मिलींद जोशी

इस्लामपूर । प्रतिनिधी

सत्याचा शोध घेणे हे लेखकाचं काम आहे.सत्य कोणत्याच बाजूचं नसतं.सत्य नेहमी अल्पमतात असतं. सत्याचा झेंडा लेखकाने खांद्यावर घेऊन लेखन करायला हवं. लेखकाचा आपल्या प्रतिभाशक्तीवर विश्वास हवा. मातीशी नाळ जोडंत ग्रामीण वास्तव आपल्या लेखणीत उतरवावं.तरुणांच्या बळावर महासत्तेचा स्वप्न पाहत असताना, त्या तरुण पिढीच्या पोटाचा प्रश्न शिक्षणातून सोडवला नाही तर ही पिढी आपल्याला माफ करणार नाही. असे मत साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद जोशी यांनी व्यक्त केले. ते श्री.कामेश्वरी साहित्य मंडळ व स्वातंत्र्यसैनिक बाळकृष्ण विष्णूजी पाटील सामाजिक संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या मातृ स्मृती ग्रामीण साहित्य संमेलन व राज्यस्तरीय मातृ स्मृती साहित्य पुरस्कार वितरण समारंभाच्या निमित्ताने संमेलनाध्यक्ष म्हणून बोलत होते. मंगळवेढा येथील शास्त्रज्ञ डॉ. सुभाष कदम, जेष्ठ साहित्यिक प्रा. चंद्रकुमार नलगे,प्रा.शामराव पाटील,ऍड. बी. एस.पाटील,प्रा.आप्पासाहेब खोत, बाबुशेठ पांडकर,(सासवड) प्रा.वि. द. कदम, प्रा.चंद्रशेखर कांबळे डॉ.श्रीकांत पाटील, धनाजी धोंडीराम घोरपडे,शिराळा तहसीलदार शामल खोत पाटील यांची उपस्थिती होती.

गोव्याचे जेष्ठ साहित्यिक विठ्ठल गावस, चंद्रकांत गावस यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.प्रा.संपत पार्लेकर(पलूस)प्रकाश काशीद(बेळगाव)प्रमोद गोराडे(अमरावती) सखाराम कांबळे(बेळगाव) गजानन देसाई(गोवा) शिवाजी चाळक (पुणे) हरिचंद्र पाटील(टेम्भुर्णी) प्रा. विनोद गायकवाड(बेळगाव) देवा झिंझाड यांना राज्यस्तरीय मात्र स्मृती साहित्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.पलूस येथील लेखक सत्येंद्र सुरेश कामत यांच्या 'टाक डुई डुई' , 'प्रीत पोरका', 'खोटी खाईटी' या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं. यावेळी डॉ. मिलिंद जोशी म्हणाले, शिक्षण घेऊन सुद्धा जर युवकांना नोकरी मिळत नसेल तर आपण महासत्ता कसे बनणार. आपण वैज्ञानिक निर्माण केले, पण वैज्ञानिक दृष्टीची माणसं निर्माण केली नाही. साहित्य निर्मितीची कवाडे ग्रामीण अधिवास वाड्यावस्त्यांवर आहेत.ग्रामीण समस्या आपल्या लेखनामध्ये यायला हव्यात.सार्वजनिक जीवनात धर्म आणायचा नाही. राजकीय पोळ्या भाजण्याचं काम केलं जात आहे. लेखकाने कोणत्याही रंगाचा झेंडा खांद्यावर न घेता निपक्षपातीपणानं प्रतिभेवर विश्वास ठेवून लेखन करायला हवं. लेखकाचा मानव धर्म आहे. जातीपातीचा विचारातून बाहेर पडेल असे लेखन हवे. मातीशी असलेली नाळ तोडू नये. पोटाचा प्रश्न शिक्षणातून सोडवायला हवा. एका पेनाची किंमत पेन विकणारा ठरवतो,तर शेतकऱ्यांच्या मालाचे किंमत शेतकरी का ठरवत नाही? शेतकऱ्याच्या हातात काहीच नाही. नापिकी,ओला, कोरडा दुष्काळ,नाकारलेला माणूसपण हे शेतकऱ्यांच्या मृत्यूला कारणीभूत ठरत आहे.याची तीव्रता वाढली तर पांढऱ्या पेशांचं जगणं मुश्किल होईल. शेतकऱ्यांच्या कथा वेदना संघर्ष हा लेखकाच्या लेखणीतून बाहेर यायला हव्यात. ग्रामीण भागातला माणूस समजून घेणे गरजेचे आहे. युवकांचा आक्रोश साहित्यिकांनी समजून घ्यायला हवा. ग्रामीण अस्वस्थता मांडायला हवी. ग्रामीण भाग व शेतकऱ्यांचे प्रश्न प्रतिभेतून पुढे यावे. कर्जाच्या रूपाने पत वाढली पण स्वास्थ्य नाही. आनंदासाठी निर्माण करणारी संस्कृती हा प्रमोद आहे. जातीभेदाच्या भिंती नष्ट व्हायला हव्यात. संस्कृती माणसाला समृद्ध करते .समाजातला खालचा स्तर अतिशय वाईट परिस्थितीत जगत आहे. चळवळी बंद झाले आहेत. जे लिहितात वाचतात बोलतात त्यांची दखल घेतली जात नाही.सत्य व सत्व हरवले आहे. भावनिकदृष्ट्या समाज कुपोषित होत आहेत.हे कुपोषण कमी करण्यासाठी साहित्यिकांनी लिहायला हव. विचारवंत माणसं गप्प बसली तर त्यांची किंमत समाजाला भोगावी लागते. संस्कृती माणसाला समृद्ध करते. राजकारणाचा माज असू नये. राजकारण म्हणजे संपूर्ण जीवन नाही. राजकारणावर मात करण्यासाठी लिहा. साहित्यिकानी समाजाच्या घडामोडींशी जोडायला हवं. समीक्षेचं अधःपतन साहित्य विश्वाला पछाडलेला आजार आहे. लेखक आणि समीक्षकांनी साहित्य कृतीतली ही सौंदर्य स्थळ लोकांच्या पर्यंत पोहोचवली पाहिजेत. समीक्षा गटातटाणे विभागली आहे.पुस्तक गाजवणे म्हणजे बेन्टेक्स ला सोन्याचा दर दिल्यासारखा आहे.हिमालय तर आहेच पण टेकड्यांच्या कडे सुद्धा लक्ष देणे गरजेचे आहे. अनुभवांशिवाय लेखकाने लिहू नये.शब्दांच्या पाठीशी अनुभवाचे संचित उभे करावे. अनुभव हा शिष्टाचार व्हायला हवा. वेदना, विद्रोह,व नकारातून साहित्य निर्माण झालं. पोकळ शब्दांना काहीच अर्थ नसतो.अनुभव रहित साहित्य फिकं असतं. अनुभव विश्व तोकडे असेल तर कल्पनेत न रमता स्फूर्तीच्या अत्युच्च शिखराची वाट पहा. आणि मगच लेखन करा. नवीन लेखकांनी विनोदी लेखन करा. हास्य लेखन लोप होणे हे समाजाचे अधःपतन आहे. विनोदी साहित्य लिहायला हवं. चांगला विनोद तयार करा.संकटांना हसत सामोरे जाता येत. किळसवाने वैचारिक दारिद्र्य जोपासू नये. शिक्षक व पालक यांनी वाचायला हवं व तरच मुलं वाचणार आहेत. तंत्रज्ञानाची गरज आहे.सर्वंकष वाचन केल्याने विवेकी विचार निर्माण होतात. सुजाण नागरिक निर्माण करण्याचे काम साहित्यिकांनी करायला हवं.कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक जेष्ठ साहित्यीक दि. बा.पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा.विजय लोहार यांनी केले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .